**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शरद विश्वनाथ नाडगोंडे
रा. अभिनव पार्क, सी-२, प्रतिभानगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल, जि. कोल्हापूर
२. **अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर

उत्तरवादी

१. **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर

२ **जन माहिती अधिकारी** तथा
विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१२, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१७ + ४५८ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. शरद विश्वनाथ नाडगोंडे
रा. अभिनव पार्क, सी-२, प्रतिभानगर, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर श्री. एन. व्ही. कल्याणकर

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी, करवीर उपविभाग,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. दिपक क्षीरसागर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४१७ / कोल्हापूर | १२.५.२००८ | २३.५.२००८ | २३.५.२००८ | ३१.५.२००८ |
| ४५८/ कोल्हापूर | ७.३.२००८ | ३१.३.२००८ | २.७.२००८ | ३१.७.२००८ |
| माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | | | | |

## विवेचन

**अपील क्र. ४१७**

कोणतीही पूर्वसूचना न देता भूसंपादनाची कार्यवाही केली गेली. मिळकतमालकांना त्याबाबत कोणतीही कल्पना नसताना व उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करुन हितसंबंधितांना पाठीशी घालण्यासाठी केलेल्या कारवाईची माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शरद विश्वनाथ नाडगोंडे यांनी केली.

सन १९९२ पासूनच्या कागदपत्रांची माहिती, तसेच जिल्हा पुनर्वसन अधिकारी, कोल्हापूर, निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार कागल, मंडल अधिकारी, कागल, तलाठी व्हन्नूर यांनी विशिष्ट दिवशी काय काम केले? ते कोठे होते? बाहेर जाताना कोणते वाहन वापरले? इथपर्यंत विविध स्वरुपाची विस्तृत माहिती श्री. नाडगोंडे यांनी मागितली होती. उपलब्ध माहिती विहित मुदतीत दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल श्री. एन.व्ही. कल्याणकर यांनी केले.

श्री. नाडगोंडे यांनी मागितलेली माहिती विस्तृत असून काही मुद्दयांमध्ये स्पष्टीकरण, व अवाजवी तपशील (उदा. मिळकतीमध्ये आलेल्या महसूल यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांनी वापरलेल्या गाडीचा क्रमांक, गाडीच्या चालकाचे नाव इ. ) मागितला आहे. अशा प्रकारची माहिती देय ठरत नाही. तथापि श्री. नाडगोंडे यांनी हव्या असलेल्या नेमक्या कागदपत्रांची यादी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,कागल यांना सादर करावी. संबंधित प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास १५ दिवसांत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल यांनी द्यावी, असे मौखिक आदेश

आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. संबंधित कागदपत्रांचे जतन अभिलेखांच्या वर्गवारीनुसार केले नसल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख २००५ अन्वये संबंधित कर्मचारी फौजदारी कारवाईस पात्र ठरतील. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,कागल यांनी अहवाल सादर केला नाही. तसेच आपल्याला आवश्यक माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्यांनी आयोगाकडे केली. त्याबाबत आयोगाने अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल यांना दि. १६.११.२००९ रोजी दूरध्वनी संदेशाद्वारे व दि.२८.११.२००८ रोजी पत्राद्वारे विचारणा केली. त्यावर तहसीलदार, कागल श्री. एस. एस. मुळे यांनी दि.१६.९.२००९ च्या पत्रान्वये श्री. नाडगोंडे यांनी अपिलाच्या सुनावणीनंतर नेमक्या कागदपत्रांच्या नकलांची मागणी केलेली नाही. तशी मागणी त्यांनी केल्यास नकला देण्यात येतील, असे नमूद केले आहे.

**अपील क्र. ४५८ / कोल्हापूर**

याच विषयाबाबत श्री. नाडगोंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१२, कोल्हापूर यांच्याकडे वेगळ्या अर्जाद्वारे माहिती मागितली होती. ती माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री. नाडगोंडे यांनी केली.

श्री. नाडगोंडे यांनी एकूण २७ मुद्दयांची माहिती मागितली होती. तहसीलदार व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली व ती दिली. काही मुद्दयांबाबत श्री. नाडगोंडे यांनी भाष्य अथवा कागदोपत्री नसलेल्या तपशिलाची मागणी केली होती, ती देणे शक्य नव्हते, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१२, कोल्हापूर यांनी केले. श्री. नाडगोंडे यांची मुख्य तक्रार उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्याची आहे. तसेच भूमी संपादनाबाबत त्यांचे आक्षेप प्रशासकीय कार्यवाहीशी संबंधित आहेत. तथापि संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन आणखी माहिती हवी असल्यास देण्यात येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री. तुकाराम कासार यांनी केले.

अपीलकर्ता श्री.नाडगोंडे यांनी प्रशासकीय कार्यवाहीचे विषय व भाष्य वगळून हवी असलेल्या नेमक्या माहितीचा तपशील जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी

क्र.१२, कोल्हापूर यांच्याकडे द्यावा, उप विभागीय अधिकारी, करवीर विभाग, कोल्हापूर यांनी विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१२, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याशी विचार विनिमय करुन सर्व संबंधितांची एकत्रित बैठक घेऊन अपीलकर्त्यांस आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.१.१.२००९ रोजी बैठक घेण्यात आली. त्यावेळी श्री. नाडगोंडे यांनी मागणी केल्यानुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली, असे उप विभागीय अधिकारी, करवीर उपविभाग, कोल्हापूर श्री. दिपक क्षीरसागर यांनी दि. २९.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. श्री. नाडगोंडे यांनी आवश्यक माहिती मिळाल्याचे नमूद करुन पोहोच दिल्याच्या पत्राची छायांकित प्रत त्यासोबत सादर केली आहे.

उपरोक्त प्रकरणातील उभय बाजूंची निवेदने, कागदपत्रे व अनुषंगिक कार्यवाही लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.४१७ मध्ये आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, ही बाब गंभीर असून त्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल श्री. एस. एस. मुळे यांनी दि. २५.१.२०१० पर्यंत आयोगाला खुलासा करावा.

पुणे
दि. ०८.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.एकनाथ हरिभाऊ मुरकर
२७८३, ए-वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर मूळ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
२०४,/ख/ई, शाहूपुरी, भू-विकास बँक इमारत, तिसरा मजला,
हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, शाहू मार्केट, कोल्हापूर अपीलकर्ता

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१९+४२०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.एकनाथ हरिभाऊ मुरकर
२७८३, ए-वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
२०४,/ख/ई, शाहूपुरी, भू-विकास बँक इमारत, तिसरा मजला,
हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, शाहू मार्केट,
कोल्हापूर तर्फे ॲड.किरण पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अर्जदार श्री.एकनाथ हरिभाऊ मुरकर व श्री.रघुनाथ तुकाराम जगताप यांचा संस्थेशी संबंध नसताना अन्य हितसंबंधी व्यक्तीच्या चिथावणीवरून त्या व्यक्तीसाठी माहिती मागितली. सदस्यांव्यतिरिक्त कोणालाही ही कागदपत्रे द्यावयाची नसल्यामुळे व संस्थेला शासनाने कोणताही निधी अथवा अर्थसहाय्य दिलेले नाही, म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार शेती उत्पन्न बाजार समिती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यामुळे, तरीही अर्जदारांना निःशुल्क माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी दिला. तो बेकायदेशीर असून रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता सचीव, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, शाहू मार्केट, कोल्हापूर यांच्यातर्फे ॲड.किरण पाटील यांनी केली.

शेती उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना राज्य विधीमंडळाने संमत केलेल्या शेती उत्पन्न बाजार समिती कायद्यानुसार झाली आहे. विधीमंडळाने संमत केलेल्या विशिष्ट कायद्यानुसार झालेली समितीची निर्मिती, तसेच समितीच्या विविध योजनांसाठी सरकारतर्फे दिले जाणारे अनुदान व सवलती लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) मधील तरतुदींनुसार शेती उत्पन्न बाजार समिती हे सार्वजनिक प्राधिकरण ठरते. संस्थेच्या निवडणुकीसाठी सरकारने कर्जाऊ रक्कम दिली आहे. या बाबी लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

संस्थेला लागू होतो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी केले.

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे निवेदन लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समितीने माहिती देणे आवश्यक आहे. मात्र त्याच वेळी अपील क्र.४२० मधील मूळ अर्जदार श्री.रघुनाथ तुकाराम जगताप यांनी सदर कागदपत्रांची आपल्याला कोणतीही आवश्यकता नसल्यामुळे अर्ज मागे घेत असल्याचे दि.२५.११.२००८ च्या पत्रान्वये सभापती / सचिव, शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर यांना कळविले आहे. असेच पत्र अपील क्र.४१९ मधील मूळ अर्जदार श्री.एकनाथ हरिभाऊ मूरकर यांनी दि.१८.११.२००८ रोजी समितीच्या सचिवांना दिले आहे. ही पत्रे, बाजार समितीच्या प्रतिनिधींनी केलेले निवेदन आणि उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुधाकर मारोतराव गजबे
कु.रुक्मिणी गजबे मार्ग, गोपालनगर,
पो.राणाप्रतापनगर, नागपूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** संशोधन अधिकारी,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** संशोधन अधिकारी,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.०८.२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्यानें निर्णय दिल्ल्याची तारीख | दि.३०.११.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - गोंड - गोवारी जमाती संदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुधाकर मारोतराव गजबे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २५/०१/२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र किसन जाधव
२९५, रविवार पेठ, उमाजी नाईक चौक,
माणिकवाडी, फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहसंचालक(उच्च शिक्षण),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सहसंचालक कार्यालय
(उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र किसन जाधव
२९५, रविवार पेठ, उमाजी नाईक चौक, माणिकवाडी, फलटण, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सहसंचालक कार्यालय (उच्च शिक्षण),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.वसंत साहेबराव जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.१२.२००७ |
| २ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

प्रत्यक्ष सेवेत नसलेलया व्यक्तींच्या नेमणुका दाखवून संस्थेची फसवणूक केली. त्यांच्या हजेरीपत्रकाची व खोट्या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती मिळाली नाही. तसेच आपली नेमणूक, पदोन्नती आदीत झालेल्या अन्यायाबाबतची माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रामचंद्र किसन जाधव यांनी केले.

श्री.जाधव यांनी मागितलेली माहिती मुधोजी महाविद्यालय, फलटण व फलटण एज्युकेशन सोसायटी यांच्याशी संबंधित असल्यामुळे प्राचार्य व संस्थेचे सचिव यांना तसे कळविण्यात आले. महाविद्यालयाकडून माहिती उपलब्ध करून श्री.जाधव यांना देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहसंचालक कार्यालय (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.वसंत साहेबराव जाधव यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. सेवाज्येष्ठतेबाबत फलटण एज्युकेशन सोसायटीमध्ये अनेक कर्मचाऱ्यांविषयी गोंधळ झाल्याने चौकशी करण्यात येत आहे. ती पूर्ण झाल्यानंतर श्री.जाधव यांच्यासारख्या सेवाज्येष्ठतेबाबतच्या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर डॉ.बी.बी.कदम यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात लेखी नमूद केले.

चुकीची वेतननिश्चिती का केली, बढतीपासून आपल्याला वंचित का ठेवले, पाचव्या आयोगानुसार वेतन का दिले नाही, अशासारखे खुलासा अथवा भाष्य यांची मागणी करणारे प्रश्न श्री.जाधव यांनी अर्जामध्ये विचारले आहेत. आपल्याव अन्याय झाल्याची त्यांची तक्रार आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये येत नाहीत. ऊर्वरित माहिती त्यांना देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती हेमा अंबादास मोरे — अपीलकर्ता
घर नं.८५, निर्मिती विहार, विजापूर रोड,
सोलापूर

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१.२००९ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** — श्रीमती हेमा अंबादास मोरे, घर नं.८५, निर्मिती विहार, विजापूर रोड, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा — लेखापाल, सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. आय.बी. हुबळीकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अण्णासाहेब पाटील प्राथमिक विद्यालयातील शिक्षकांचे थकत वेतन व वेतन अडविण्याची कारणे याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी एकदा सुनावणी घेतली. त्यानंतर दिलेल्या तारखेला सुनावणी घेतली नाही व नंतर सुनावणीही घेतली नाही व माहितीही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती हेमा अंबादास मोरे यांनी केली.

मुख्याध्यापक व शाळेमधील शिक्षक यांच्यामध्ये वाद आहे. माहिती देण्यास शाळेच्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना कळविले होते. त्यांनी योग्य खुलासा केला नाही. सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यांनीच पुढील तारीख मिळण्याचा अर्ज केला. विषयांकित शाळा विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देत नसल्याने वेतन थांबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. आय. बी. हुबळीकर यांनी केले.

अपीलकर्त्यांनी सुनावणीची पुढील तारीख स्वतःच मागितलेली असताना वस्तुस्थितीशी विसंगत विधाने करुन दिशाभूल करु नये, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी माहितीबाबतचा नेमका तपशील अपीलकर्त्यास दोन दिवसांत द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२९.१.२००९ रोजी श्रीमती हेमा अंबादास मोरे यांना माहिती देण्यात आल्याचे संबंधित माहितीच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी, तथा प्रशासन

अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी दि. १५.७.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १३.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंदराव बाबुराव पाटील — अपीलकर्ता
मु.पो.गडमुर्डशिंगी, ता. करवीर, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करवीर ता. करवीर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, उमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या., गडमुर्डशिंगी, ता.करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००१ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. आनंदराव बाबुराव पाटील
मु.पो.गडमुडशिंगी, ता. करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करवीर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
श्री. भारत अंबादास मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा — सचीव, उमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी
पुरवठा मंडळ, लि. गडमुर्डशिंगी, ता.करवीर,
जि. कोल्हापूर श्री. ज्योती आण्णा परीट

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या पाणीपट्टी बाबतची व लेखा परीक्षण आदींबाबतची माहिती वारंवार मागणी करुनही सचीव, उमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या., गडमुडशिंगी यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा सहाययक निबंधक, सहकारी संस्था, करवीर, जि. कोल्हापूर यांनी आदेश देऊनही संस्थेने माहितीची पूर्तता केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. आनंदराव बाबुराव पाटील यांनी केली.

संस्थेत आपण एकटेच काम पाहत असून पाणीपुरवठ्यासह सर्व कामे आपल्याला करावी लागत असल्यामुळे, तसेच श्री. आनंदराव बाबुराव पाटील हे सातत्याने विविध स्वरुपाचे अर्ज करीत असल्यामुळे माहिती देणे शक्य झाले नाही, असे निवदेन जन माहिती अधिकारी तथा सचीव, उमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या., गडमुडशिंगी, ता. करवीर श्री. ज्योती आण्णा परीट यांनी केले.

संस्थेने माहिती देणे वारंवार व हेतुतः टाळल्यामुळे संस्थेची व्यवस्थापकीय समिती बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती केली. परंतु संस्थेने विभागीय सहाय्यक निबंधक, कोल्हापूर यांच्याकडे या निर्णयास आव्हान दिले व त्यांनी व्यवस्थापकीय मंडळ बरखास्तीस स्थगिती दिली, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करवीर, जि. कोल्हापूर श्री. भारत अंबादास मोरे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे लक्षात घेता अपीलकर्त्याने वारंवार अर्ज करुन विस्तृत स्वरुपाची माहिती मागण्याऐवजी आवश्यक तर अभिलेखांचे अवलोकन करणे उचित ठरेल.

त्यानुसार अवलोकन करु देऊन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती देण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करवीर, जि. कोल्हापूर यांनी करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ८.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. अजित अर्जुन घोरपडे — अपीलकर्ता
१३९/४/१, शाहुनगर, गोडोली, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचीव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२९ + ४३० + ४३१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचीव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे श्री. प्रमोद जाधव

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४२९ / सातारा | १७.१.२००८ | १३.२.२००८ | ३.३.२००८ | ७.४.२००८ |
| ४३० / सातारा | १७.१.२००८ | १३.२.२००८ | ३.३.२००८ | -- |
| ४३१ / सातारा | १७.१.२००८ | १३.२.२००८ | ३.३.२००८ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार कुणबी जातीचा दाखला दिला जात नाही. श्री. अभिजीत विष्णू ढाणे व श्री. धैयशील विजय कणसे यांची प्रकरणे चौकशीसाठी पोलिस दक्षता पथकाकडे पाठविली नाहीत, आपले प्रकरण मात्र पाठविले. अन्य काही व्यक्तींबाबतही त्वरित दाखला दिला गेला. याबाबतचे स्पष्टीकरण न मिळाल्याच्या व अन्याय झाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री. अजित अर्जुन घोरपडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत. त्यांचे या संदर्भात ६ ते ७ अर्ज असून सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. परंतु श्री. ढाणे व श्री. कणसे यांच्या प्रकरणातील निर्णयासारखा निर्णय आपल्या बाबतीत व्हावा, अशी त्यांची सर्व पत्रव्यवहारातील मागणी आहे. ही प्रशासकीय कार्यवाहीविषयक बाब आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे श्री. प्रमोद जाधव यांनी नमूद केले. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त असल्याचे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

पुणे
दि. २५.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीपाल शिवाप्पा नाईकवाडे
मु.पो.घोसरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जनरल मॅनेजर, श्री दत्त नागरी
सहकारी पतसंस्था मर्यादित, चिंचवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३२/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीपाल शिवाप्पा नाईकवाडे
मु.पो.घोसरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.बी.एम.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा जनरल मॅनेजर, श्री दत्त नागरी
सहकारी पतसंस्था मर्यादित, चिंचवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.श्री.पां.उदगांवे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे दि.६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

हजेरीपत्रक, पगारपत्रक आदिंबाबतची श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्थेकडील माहिती न दिल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.श्रीपाल शिवाप्पा नाईकवाडे यांनी केली. सहकारी पतसंस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तसेच श्री.नाइकवाडी यांनी आपल्या संस्थेविरूध्द कोल्हापूरच्या कामगार न्यायालयात केलेला दावा अंतिम टप्प्यात आहे, त्यामुळे त्यांना माहिती नाकारली, असे पतसंस्थेचे जन माहिती अधिकारी तथा जनरल मॅनेजर, श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चिंचवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.पी.उदगांवे यांनी सांगितले. ते मान्य करण्यात येत आहे. (नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्कर शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयोग, नागपूर व इतर-२, क्र.५२९४/२००८, दि.२८.४.२००९ या खटल्यात दिला आहे.)

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळकृष्ण बापुराव राजमाने
मु.पो. कोरोची, (ढेंगणे शिरगावी गिरणी),
पो. तारदाळ, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुद्ध

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक,
इचलकरंजी आगार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.१.२००९ |

३. उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, कोल्हापूर
श्री. अरविंद हुल्लाप्पा पालेकर

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक,
इचलकरंजी आगार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर
श्रीमती यामिनी केदार जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निपटारा कार्यक्रमा'स व दि. ७.१.२००९ रोजी आयोगापुढील सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर होते.

त्रयस्थ व्यक्तींची माहिती श्री. राजमाने सातत्याने मागत असतात. एका चालकाने वर्षभरात केलेल्या कामासंदर्भातील तपशीलवार माहिती अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण बापूराव राजमाने यांनी मागितली होती. त्यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही. शुल्क न भरता त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. शुल्काबाबत विचारणा केली असता त्यांनी कोणतेही उत्तर पाठविले नाही. त्याबाबत पुन्हा त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु शुल्क न भरता व जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याशी संपर्क न साधता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. माहिती तयार आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, इचलकरंजी श्रीमती [illegible] यांनी पुरेशा कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्याची तक्रार रास्त नाही. तसेच अपीलकर्त्यांची अशा प्रकारची कार्यपद्धती सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करणारी आहे. त्याबाबत अपीलकर्त्यांस समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १३.[illegible].२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तमराव महादेवराव भोसले
मु.पिंपळवाडी, पो.साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा निबंधक, वर्ग-१,
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निबंधक, वर्ग-१,
सहाय्यक दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३६/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उत्तमराव महादेवराव भोसले
मु.पिंपळवाडी, पो.साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा निबंधक, वर्ग-१,
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा निबंधक, वर्ग-१,
सहाय्यक दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, जि.पुणे, पुणे श्री.पी.डी.आहिरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री रतनसिंह शंकरराव नाईकनिंबाळकर यांच्यासह चार व्यक्तींनी दि.१.११.२००१ नंतर केलेल्या मालमत्ता खरेदीविक्रीची तपशिलवार माहिती आपण मागितली होती, परंतु ती मिळाली नाही. याबाबतचा शोध घेण्यास मदत करण्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक, वर्ग-१, व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांनी मान्य केले आहे, असे अपीलकर्ता श्री.उत्तमराव महादेवराव भोसले यांनी नमूद केले.

मालमत्तेचा शोध घेऊन माहिती द्यावी, अशा स्वरूपाची ही मागणी आहे. माहितीच्या अधिकारात अशी मागणी येत नाही. तथापि, शक्य तेवढा शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती देण्याची कार्यवाही आपण करणार आहोत. मूळ अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, जि.पुणे श्री.ए.व्ही.चटलावार यांनी उत्तर दिले होते, सध्या ते निलंबित आहेत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक, वर्ग-१, व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे यांनी केले. श्री.भोसले यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या मालमत्तेची माहिती मागितली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याची मागणी संदिग्ध असून त्रयस्थ व्यक्तीच्या मालमत्तेविषयक व्यवहाराची माहिती शोध घेऊन द्यावी. ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१८.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत आप्पासाहेब खेडे
मु.पो.आणूर, ता.कागल, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, पिंपळगाव विद्यालय,
पिंपळगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३७, ४३८,४३९, ४४०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंद्रकांत आप्पासाहेब खेडे
मु.पो.आणूर, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.शरद शंकरगिरी गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, पिंपळगाव विद्यालय,
पिंपळगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर कु.एस.आर.कोकाटे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४३७ | १९.६.२००८ | २५.८.२००८ | २१.७.२००८ | १८.८.२००८ |
| ४३८ | २१.६.२००८ | २५.८.२००८ | २२.७.२००८ | १८.८.२००८ |
| ४३९ | १६.६.२००८ | २५.८.२००८ | १८.७.२००८ | १८.८.२००८ |
| ४४० | २४.६.२००८ | २५.८.२००८ | २५.७.२००८ | १८.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | | | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री गजानन शिक्षण संस्था, आणूर यांच्या पिंपळगाव विद्यालय, पिंपळगाव बुद्रुक, ता.कागल, जि.कोल्हापूर या शाळेसंबंधीची विविध माहिती मागणारे चार अर्ज आपण केले होते. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, पिंपळगाव विद्यालय, पिंपळगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर यांनी समक्ष अर्ज न स्वीकारल्यामुळे रजिस्टर टपालाने पाठविले. तेही स्वीकारले नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केल्यानंतर अर्ज स्वीकारले, परंतु न्यायालयीन वादाचे व त्यामुळे शाळेची माहिती गोपनीय असल्याचे कारण सांगून माहिती नाकारली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश दिल्यानंतरही माहिती दिली नाही, म्हणून शाळेवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.चंद्रकांत आप्पासाहेब खेडे यांनी केली.

कार्यवाहीचा अहवाल आयोगाला प्राप्त झालेला नाही. संस्थेकडील माहिती देण्याबाबत मुख्याध्यापिका कु.एस.आर.कोकाटे यांनी संस्थेचे अध्यक्ष व सचीव यांना लेखी कळविले असून मूळ अर्जानुसार काही माहिती द्यावयाची राहिली असल्यास त्याला श्री गजानन शिक्षण संस्था, आण्णूर यांचे अध्यक्ष व सचिव जबाबदार ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्ता यांना गजानन शिक्षण संस्था, आणूर, ता.कागल, जि.कोल्हापूर या संस्थेकडील माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांनी दि.२५.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१३.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महिबूब बुजरूक शेख
७०७, भारतरत्न इंदिरानगर गेंटयाल टॉकीजजवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
अहिल्याबाई प्राथमिक शाळा क्र.६८, आदर्शनगर, कुमठा नाका, सोलापूर

(२)**जन माहिती अधिकारी** तथा उपसचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

(३)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३८+११४६+९६७+८००/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महिबूब बुजरूक शेख
७०७, भारतरत्न इंदिरानगर गेंटयाल टॉकीजजवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.व.मा.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर श्री.आय.बी.हुबळीकर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याचा दिनांक | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याचा दिनांक | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ४३८ | १.११.२००६ | २१.४.२००७ | ३.५.३००७ | २४.५.२००७ |
| ११४६ | १९.२.२००८ | -- | १३.६.२००८ | -- |
| ९६७ | ३०.५.२००७ | | ३१.१२.२००७ | |
| ८०० | १४.६.२००७ | | ३१.१२.२००७ | १.१२.२००७ |
| ४ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | | | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८, १९.११.२००८ व १७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२८.१.२००९(अ.क्र.४३८), दि.३०.६.२००९ (अ.क्र.११४६ /९६७/८००) रोजी सुनावणी घेण्यात आली.

अहिल्याबाई प्राथमिक शाळा क्र.६८, आदर्शनगर, कुमठानाका, सोलापूर या खाजगी शाळेतील श्रीमती इम्तियाजबी सैपन शेख या शिक्षिकेची वयोमर्यादा आठ वर्षे एक दिवस शिथिल करण्यात आली. त्या अनुषंगाने, खाजगी शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे जादा वय कोणत्या शासन निर्णयानुसार व नियमानुसार शिथिल करण्यात येते, याची आपण मागितलेली

माहिती दिली जात नाही. मूळ अर्जानुसार आपल्याला पूर्ण माहिती मिळावी व शासन निर्णयाची माहिती जाणीवपूर्वक न दिल्याबद्दल संबंधितांवर शास्तीसह कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.महिबूब बुजरूक शेख यांनी केली.

**अपील क्रमांक-४३८**

आपण मागितलेली माहिती सहा महिन्यांनी व तीही अपुरी दिली. अनुकंपाविषयक शासन निर्णय दिले नाहीत, असे प्रतिपादन श्री.शेख यांनी केले.

खाजगी शाळेतील एका शिक्षिकेबाबतची माहिती श्री.शेख यांनी मागितली होती. ती देण्याबाबत मुख्याध्यापकांना कळविले. माहिती आपल्याला मिळाल्याचे श्री.शेख यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितले, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे श्री.व.मा.गायकवाड यांनी नमूद केले.

संबंधित शासन निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास द्यावी. तसेच जादा वय क्षमापित करण्याबाबतच्या नियमांचा तपशीलही द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार नियमांची प्रत व संबंधित शिक्षिकेचे जादा वय क्षमापित करण्याबाबतच्या सन १९९४ मधील आदेशाची प्रत श्री.शेख यांना देण्यात आली. संबंधित शासन निर्णयाची प्रत मात्र आपल्या कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध होत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.व.मा.गायकवाड यांनी दि.१६.७.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

**अपील क्रमांक-११४६+९६७+८००**

आपण मागितलेल्या शासन निर्णयाची प्रत मिळाली नाही, म्हणून केलेल्या अपिलाची दखल घेतली गेली नाही. शिक्षण खात्यातील कर्मचाऱ्यांनी अहिल्याबाई प्राथमिक शाळेशी संधान बांधून संबंधित शिक्षिकेला नियमबाह्य पध्दतीने जादा वय क्षमापित केले असल्यामुळे खरी माहिती

न देता दिशाभूल करणारी माहिती देऊन फसवणूक करण्यात येत आहे, असे प्रतिपादन श्री.शेख यांनी केले.

श्री.शेख यांनी सन १९७४ च्या शासन निर्णयाचा उल्लेख केला असून वेगवेगळ्या पातळ्यांवर शोध घेऊनही तो उपलब्ध झाला नाही. तसेच संबंधित शासन निर्णय कालबाह्य झाला असून खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांसाठी शासनाने सन १९८१ मध्ये लागू केलेल्या महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ नुसार आता कार्यवाही करण्यात येते. जादा वय क्षमापित करण्याबाबतची तरतूद सन १९८१ च्या नियमावलीत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका श्री.आय.बी.हुबळीकर यांनी केले. श्री.शेख यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केला नव्हता. राज्य माहिती आयोगाने केलेल्या विचारणेनंतर आयोगाकडून त्यांच्या अर्जाची प्रत प्राप्त करून घेतली असता श्री.शेख यांनी मूळ अर्ज शालेय शिक्षण मंत्र्यांकडे केला असल्याचे दिसून आले, असेही त्यांनी नमूद केले. जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज न करता अर्ज व अपील शालेय शिक्षण मंत्र्यांकडे केले, ही चूक झाल्याचे श्री.शेख यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक यांनी संबंधित शासन निर्णयाची प्रत १५ दिवसांत अपीलकर्त्यास उपलब्ध करून द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार 'सदर शासन निर्णयाची प्रत शिक्षण संचालनालय प्राथमिक व शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे खास प्रतिनिधी पाठवून दि.३,४,८,१३ व १४ जुलै २००९ रोजी शोध घेण्यात आला, मात्र सदर निर्णयाची प्रत आढळ झालेली नाही. मात्र शासन निर्णय व्हीएलएस-१०७४/एफ/३४८९२, दि.८.२.१९७४ ची प्रत उपलब्ध झाली असून तोच शासन निर्णय असावा, असे वाटते. त्याचा विषय व त्यासोबतचे शेड्यूल एफ.बी. हे अपीलकर्त्याने मागणी केल्याप्रमाणे असल्याने अपीलकर्त्यास त्याची प्रत देण्यात आली आहे,' असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक यांनी दि. १६ जुलै २००९ च्या पत्राने आयोगाला सादर केला. तथापि, आपल्याला योग्य माहिती न मिळाल्याची तक्रार श्री.शेख यांनी दि.२९.७.२००९ च्या

पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने लक्षात घेता जादा वय क्षमापनाबाबतच्या नियमातील तरतूदींची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली असल्याचे स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. .१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश चिंतामण देशपांडे
शकुन विश्वकोश कॉलनी, एस.टी.स्टँडजवळ, वाई, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश
निर्मिती मंडळ, मुंबई-२५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई-२५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश चिंतामण देशपांडे
शकुन विश्वकोश कॉलनी, एस.टी.स्टँडजवळ, वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

प्रवास भत्ता कमी काढणे, वेतन रोखणे, सेवाज्येष्ठता डावलून कनिष्ठ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे, अशा प्रकारची नियमबाह्य कारवाई केल्याने आपल्यासह सहा कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला. त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई-२५ यांनी दिली नाही. रोखलेली वेतनवाढ फरकासह मंजूर करणे ही तडजोड होऊ शकते, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुरेश चिंतामण देशपांडे यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये स्पष्टीकरण, खुलासा, भाष्य यांची मागणी करता येत नाही. अपीलकर्त्याने अशा प्रकारची मागणी केली असून त्याचेही उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले दिसते. तसेच संबंधित कारवाईबाबत अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई-२५ यांनी खुलाशासह विस्तृत निवेदन केले आहे. अपीलकर्त्याची तडजोडीची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

डॉ.तिलकदास सुधाकर शेट्टी
४०२/४०३, त्रिसंध्या बिल्डिंग,
९७,दादासाहेब फाळके रोड,
दादर (पू.), मुंबई -१४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** लोणावळा नगरपरिषद, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४/२०१०/पुणे |
| २ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती-**<br>लोणावळा नगरपरिषद हद्दीतील हॉटेल्सच्या अनधिकृत बांधकामाबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता, डॉ.तिलकदास सुधाकर शेट्टी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०१/२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश गणपत पवार
बंदी क्र.सी/३१५२, सर्कल नं.५/२, कोल्हापूर
मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर

अर्प

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जनसंपर्क अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवा

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखाधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुरेश गणपत पवार यांनी मागितलेली माहिती मिळाली नसल्याचे राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केले आहे. तथापि माहिती मागणीचा मूळ अर्ज, जन माहिती अधिकारी तथा जन संपर्क अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे उत्तर, प्रथम अपिलाचा अर्ज आदी कोणतीही कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत. तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' व आयोगापुढील सुनावणी यावेळी संबंधित कोणीही उपस्थित नव्हते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ७.१.२०१०**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ